MHST140025332025

**वारसा प्रमाणपत्र अर्ज क्रमांक ६०/२०२५**

कमल बाळु जाधव व इतर विरुध्द कोणीही नाही.

## निशाणी क्र.१ खालील आदेश

बॉम्बे नियमन अधिनियम (Bombay Regulation Act -VIII) १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज आहे.

२. अर्जदारांनी सदर अर्ज वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. थोडक्यात अर्जदाराचा तपशिल येणे प्रमाणे आहे की, अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील कै. बाळु बापु उर्फ बाबुराव जाधव यांचे दि.११.०७.२००५ रोजी निधन झाले आहे. सदर कै. बाळु बापु उर्फ बाबुराव जाधव यांचे एच.डी.एफ.सी. बँक शाखा पिंपरी–चिंचवड या बँकेचे कर्ज काढलेले होते. सदर कर्जाची परतफेड केलेली असून कर्जासाठी तारण म्हणून दिलेले मुळ दस्तऐवज मिळण्यासाठी गेले असता त्यांना ते कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला आणण्याबाबत मागणी केली. सबब, अर्जदार क्र.१ ते ४ यांनी प्रस्तुतचा अर्ज वारस दाखल मिळणेकामी दाखल केला आहे.

३. अर्जदार क्र.३ अमोल बाळु जाधव यांनी त्यांच्या अर्जाच्या पृष्ठ्यर्थ निशाणी क्र.१० प्रमाणे स्वतःची साक्ष नोंदविली. तसेच, अर्जदार क्र.१, ३ व ४ यांचे आधार कार्डची स्वयंम साक्षांकित प्रती अनुक्रमे निशाणी क्र.१२, १४ व १५ वर, तसेच अर्जदार क्र.२ यांचे पॅन कार्डची स्वयंम साक्षांकित प्रत निशाणी क्र.१३ वर, तसेच मयत कै. बाळु बापु उर्फ बाबुराव जाधव यांचा मृत्यू दाखला निशाणी क्र.१६ वर दाखल केला आहे. अर्जदार यांनी निशाणी क्र.१७ अन्वये पुरशिस दाखल करुन त्यांचा तोंडी व लेखी पुरावा बंद केलेला आहे.

४. अर्जदारांनी दैनिक वृत्तपत्र "सकाळ'' या वर्तमानपत्रामध्ये जाहिरनामा दिनांक १९.११.२०२५ रोजी प्रकाशित करुन मयत बाळु बापु उर्फ

बाबुराव जाधव यांचे वारस असल्याबद्दलचा कोणाचा आक्षेप आल्यास तो नोंदविण्याबाबत सर्व लोकांना सुचित केले आहे. परंतु, आजपर्यंत कोणीही त्यावर आक्षेप नोंदविला नाही. सदरच्या जाहीर नोटीसला निशाणी क्र.११ देण्यात आला आहे. जाहीर नोटीस प्रसिध्दीनंतर आजपर्यंत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही.

५. वरील विवेचनावरुन अर्जदार हे मयत बाळु बापु उर्फ बाबुराव जाधव यांचे कायदेशीर वारस आहेत असे मी मान्य करतो व त्यामुळे अर्जदारांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. अर्जदारांनी अर्जामध्ये स्थावर किंवा जंगम मालमत्ता हस्तांतरण करण्याबाबत कोठेही विवेचन केलेले नाही. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र.१ ते ४ यांना मयत बाळु बापु उर्फ बाबुराव जाधव यांचे वारस म्हणुन घोषीत करण्यात येत आहे.

३. योग्य तो न्यायालयीन शुल्क स्विकारुन अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या नावे मयत बाळु बापु उर्फ बाबुराव जाधव यांचे वारस म्हणुन वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

Digitally signed by JADHAV JITENDRA NATHA
DN: cn=JADHAV JITENDRA NATHA, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949664, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.03.16 12:28:08 +0530

दिनांक– १३.०३.२०२६

**( जे. एन. जाधव )**
४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
फलटण.

**<u>C E R T I F I C A T E</u>**

| | | |
|---|---|---|
| I affirm that, the contents of this PDF file Judgment / order are same word for word, as per original Judgment / order. | | |
| Name of the Stenographer | : | P.S. Lalage |
| Name of the Court | : | 4th Jt.C.J.J.D. and J.M.F.C., Phaltan. |
| Date of Judgment / order | : | 13.03.2026 |
| Order uploaded on | : | 16.03.2026 |

.....